| | |
|---|---|
| | **नियमित दिवाणी दावा क्र.३४१/२०२२**<br>**नि.५ वरील आदेश**<br>**जावेद मुल्ला वि. अब्दुल कलावंत व इतर**<br>**सीएनआर नं.MHKO050033542022** |

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादींविरुध्द दावा अर्जी परिच्छेद क्रं.१ मध्ये नमुद दावा मिळकत १अ मधील वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी हरकत अडथळा करु नये आणि दावा मिळकत १अ मधील अ.क्रं. २ ते १० च्या शेतजमिनीसंदर्भात प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी कोणतेही व्यवहार करु नयेत असा तुर्तातुर्त अज्ञार्थी आदेश होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी प्रस्तुत दाव्यातील कथनांचे अनुषंगाने दाव्याचे कामी हजर होऊनही त्यांचे म्हणणे अगर कैफीयत दाखल केली नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दावा व अर्ज नि.५ त्यांच्याविरुध्द विना कैफीयत चालवण्यात आला.

३. अर्ज, प्रकरणातील कागदपत्रे पाहिल्यानंतर आणि वादीच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझे विचारार्थ निघतात. त्यावर मी कारणांसहित निष्कर्ष खालीलप्रमाणे नमूद केले आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी त्याला प्रथमदर्शनी केस असल्याचे सिध्द करतो काय ? | होकारार्थी. |
| २. | सोयीस्करतेची तुला वादीच्या बाजुने आहे असे तो सिध्द करतो काय ? | होकारार्थी. |
| ३. | मागणी केल्याप्रमाणे तुर्तातूर्त मनाई न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे असे वादी सिध्द करतो काय ? | होकारार्थी. |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

४. वादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, दावा मिळकती मुळच्या राधाबाईच्या मालकी वहिवाटीची होत्या. सदर राधाबाईस वादीची आई नामे हमीदाबानु ही एकमेव वारस होती. त्यामुळे सदर हमीदाबानू आणि तिचा पती इमाम हे ताराबाईसह दावा मिळकत १अ मधील घरात राहत होते. त्यांना शशीमबानु म्हणजेच वादीची सावत्रबहिण ही एकमेव वारस मुलगी होती. हमीदाबानूच्या विवाहानंतर इमाम यांनी दौलतबीसोबत विवाह केल्यानंतरही ते राधाबाई व शशीमबानुसोबत दावा मिळकत १अ मध्येच राहत होते. त्याचप्रमाणे वादी, शशीमबानु, इमाम व दौलतबी हे दावा मिळकतीपैकी शेतजमिनीमध्ये स्वतः तसेच कुळांमार्फत कष्टमशागत करुन त्यातुन उत्पन्न घेत होते व आहेत. सदर शमीमबानुने दि.१८.४.१९९७ च्या तोंडी हिब्बानामा/बक्षीसपत्राने दावा कलम १ मधील सर्व मिळकती वादीस मालकी हक्काने दिल्या आहेत. तसेच सदर हिब्बानामाचे अनुषंगाने शशीमबानुने दि.२२.५.१९९९ रोजी नोटराईज्ड स्मरणार्थ टिप्पणी केले आहे. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्रं.१ जरी स्वतःस राधाबाईचे दत्तकपुत्र म्हणवुत असले तरी मुळातच मुस्लीम कायद्यात दत्तकविधानाची कोणतीही तरतुद नाही. त्यामुळे प्रतिवादी क्रं.१ हा कोणत्याही प्रकारे राधाबाईचा वारस नसून प्रस्तुत वादीच राधाबाईचा एकमेव वारस आहे. प्रतिवादी क्रं.१ ने कोणतीही सक्षम कागदपत्रे नसताना दावा मिळकतीस महसुल दप्तरी स्वतःच्या नावाची नोंद करुन घेतली आहे. तसेच, प्रतिवादी क्रं.१ ने केव्हाही राधाबाईची सेवासुश्रुषा केलेली नाही. वादीने तुर्तातुत अज्ञार्थी आदेशाकरता सर्व आवश्यक घटकांची पुर्तता केली असुन प्रस्तुतचा तुतातुर्त अज्ञार्थी हुकूमाचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती करण्यात आली.

५. प्रतिवादी क्रं.१ व २ तर्फे प्रस्तुत अर्जाचे कामी कोणीही हजर न झाल्याने सदरचा अर्ज त्यांच्या युक्तीवादाविना चालवण्यात आला.

### मुद्दा क्र. १ ते ३ करिता

६. सदर तिनही मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने कारणांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता मी ते एकत्रीत विचारार्थ घेत आहे. वादीने त्याच्या कथनांच्या समर्थनात

तोंडी हिब्बाच्या स्मरणार्थ हिब्बानामा टिप्पणची प्रमाणित प्रत (नि.३/१), सि.स.क्रं.३४१ चे मालमत्तापत्रक (नि.३/२), फेरफार क्रं.१४०१३ ची प्रत (नि.३/३), न.भू/त.र.क्रं.१३३/२०१६ मधील निकालाची प्रत (नि.३/४), न.भू/त.र.क्रं.१९७/२०१९ मधील निकालाची प्रत (नि.३/५),मौजे रुकडी येथील गट क्रं.५४५, ५४६, ५४९, १८३७, १८३९, १८९४, १९९६, १९९८, २००३ चे ७/१२ उतारे (नि.३/६ ते ३/१४), प्रतिवादी क्रं.१ व २ च्या दरम्यानचा ह.क.ग.दस्त क्रं.१०७९/२०२० ची प्रत (नि.३/१५) आणि ताराबाई व हसन आणि धोंडुबाई यांच्यादरम्यानचे दत्तकपत्र (नि.३/१६) त्याचप्रमाणे वादीने दिलेली जाहिर नोटीस (नि.१७/१), प्रतिवादी क्रं.१ ला दिलेली नोटीस (नि.१७/२), प्रतिवादी क्रं.१ चे नोटीस उत्तर (नि.१७/३) आणि भुमीअभिलेख यांच्यासमोरील अपील एस.आर.नं.७२४/२०१९ मधील निकालाची प्रत (नि.१७/४) या कागदपत्रांवर भिस्त ठेवण्यात आली.

**७.** वादीच्या कथनांच्या अनुषंगाने नि.३/१ कडील तोंडी बक्षिसाचे स्मरणार्थ टिपणच्या प्रतीवरुन शशीमबानूने दि. १८.४.१९९७ रोजी साक्षीदारांसमक्ष दावा मिळकती वादीला तोंडी हिब्बानामाने दिल्याचे व त्याअनुषंगाने सदरचे स्मरणार्थ टिप्पण केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. नि.३/२ च्या नगर भूमापन क्रं.३४१ च्या मालमत्ता पत्रकावरुन सदर मिळकतीस प्रतिवादी क्रं.१ चे नाव त्याचे पुर्वहक्कदार मयत अब्दुल दादु कलावंत यास सदरची मिळकत दत्तकपत्राने मिळाल्यामुळे लागल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. नि.३/१६ कडील दत्तकपत्रावरुन प्रतिवादी क्रं.१ चे पुर्वहक्कदारास मयत राधाबाईने दत्तक घेतल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. तथापी वादीतर्फे मुस्लीम कायद्याप्रमाणे अशा प्रकारे दत्तक घेण्याची प्रथा मुस्लीम व्यक्तीस नसल्याचा युक्तीवाद करण्यात आला. सदर युक्तीवादास प्रतिवादींतर्फे कोणताही विरोध करण्यात आला नाही. नि.३/३ कडील फेरफार क्रं.१४०१३ वरुन अपिलकामी झालेल्या आदेशाप्रमाण वादी व प्रतिवादी क्रं.१ या दोघांचीही नावे दावा मिळकतींच्या ७/१२ पत्रकी लागल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. सदर बाबीस नि. ३/६ ते ३/१४ कडील दावा मिळकतींच्या ७/१२ उता–यातील वादी व प्रतिवादी क्रं.१ यांच्या नावाच्या झालेल्या सामाईक क्षेत्राच्या नोंदीमुळे प्रथमदर्शनी दिसुन येते. नि.३/४ कडील

भुमि अभिलेख हातकंणगले यांच्यासमोर झालेल्या क्रं.न.भू./त.र.क्रं.१३३/२०१६ वरील आदेशावरुन फेरफार क्रं.३११ ची नोंद रद्द करण्यात आल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. नि.३/१५ कडील दस्तावरुन प्रतिवादी क्रं.१ व २ दरम्यान दावा मिळकत गट क्रं. ३४० व ३४१ संदर्भात व्यवहार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. सदर व्यवहाराच्या अनुषंगाने वादीने सदरचा व्यवहार पोकळ व बेकायदेशीर असुन त्याच्यावर बंधनकारक नसल्याचा युक्तीवाद केला आहे. नि.१७/४ कडील क्रं.न.भू./अपील एस.आर.क्रं.७२४/२०२२ च्या आदेशावरुन वादी व प्रतिवादी क्रं.१ ची नावे दावा मिळकतींच्या ७/१२ पत्रकी नमुद झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

८. वादीने तो दावा मिळकतींची पुर्वहक्कदार मयत राधाबाई हिच्या सरळ वारसाने केलेल्या हिब्बानामामुळे मालक व कब्जेवहिवाटदार झाल्याचे कथन केले आहे व त्याद्वारे प्रस्तुतची तुर्तातुर्त आदेशाची मागणी केली आहे. याउलट प्रतिवादी क्रं.१ ने जरी नि.१७/४ कडील नोटीस उत्तराकरवी वादीचा दावा मिळकतीवर हक्क नाकारला असला तरी, त्याच्या पुर्वहक्कदारांचे नावे करण्यात आलेले दत्तकपत्र कोणत्या आधारावर करण्यात आले हे स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे वादीतर्फे करण्यात आलेला युक्तीवाद की मुस्लीम कायद्याप्रमाणे मुस्लीम व्यक्तीस दत्तक विधान करण्याचा कोणताही अधिकार नाही हा आव्हानरहित राहिला आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादींतर्फे वादीची दावा मिळकतीवरील कब्जेवहिवाट नाकारण्यात आलेली नाही. अभिलेखावर दाखल असणारे दस्तऐवजांवरुनही वादी व प्रतिवादी क्रं.१ यांची दावा मिळकतीवर सामाईक मालकी असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्रं.१ व २ यांनी वादीला त्यांच्या व्यवहारात समाविष्ट न करता कसा काय व्यवहार केला हे स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे या प्राथमिक क्षणी वादीतर्फे करण्यात आलेला युक्तीवाद योग्य असल्याचा निष्कर्ष काढणे न्यायोचित वाटते. सबब, या प्राथमिक क्षणी वादीची दावा मिळकतीवर वादीची मालकी/कब्जा/ वहिवाट नसल्याबाबतचा कोणताही पुरावा या क्षणी अभिलेखावर आलेला नाही. तथापी, प्रतिवादी क्रं.१ व २ यांनी वादीचा हक्क चुकीचा असल्याचे कथन केलेले नाही. त्यामुळे दावा मिळकती या वादीच्या कब्जे–वहिवाटीत असल्याचे या प्राथमिक क्षणी दिसुन येते.

९. प्रस्तुत दाव्यातील कागदपत्रांवरुन प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाई मिळणेकरता दाखल केला असून त्याकरता वादीचे दावा मिळकतीमधील असणारे हक्क व अधिकार सिध्द होणेसाठी दावा गुणदोषावर चालणे व दोन्ही बाजूंचा पुरावा पटलावर येणे गरजेचे आहे. त्यास विलंब लागण्याची शक्यता आहे. या प्राथमिक क्षणी वादीचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज नामंजुर केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे हे शाबीत करण्यात वादी यशस्वी ठरला आहे. उपरोक्त चर्चेवरुन वादी स्वच्छ हाताने दाद मागत आहे असे या प्राथमिक क्षणी दिसुन येते. त्यामुळे दाव्याचा समतोल वादीच्या बाजुने असल्याचे या प्राथमिक क्षणी दिसुन येते. सबब, वादीच्या मागणीप्रमाणे प्रतिवादी क्रं. १ व २ विरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश देणे योग्य होईल. सबब मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. वादीचा नि.५ कडील अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्रं.१ व २ यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी वादी जावेद इमामसो मुल्ला याच्या दावा मिळकतीतील शांततामय कब्जे वहिवाटीस कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करु नये तसेच, दावा मिळकतींच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये.

३. दाव्याच्या अंतीम निकालावेळी खर्चाबाबत आदेश करणेत येईल.

Digitally signed by SHASHANK SURESH PEDNEKAR
Date: 2023.01.19 16:48:56 +0530

इचलकरंजी
दिनांक –१९.०१.२०२३

**(एस. एस. पेडणेकर)**
**६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**इचलकरंजी.**